Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी,
आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर,
पुणे ४११००४

Email : secretary.stateboard@gmail.com

Tel : Chairman (p) : STD . (020)-25651751 | EPABX -25705000 Secretary(P) : 25651750

क्र.राम/परीक्षा-२/६३८६
पुणे-४११००४
दिनांक -२३/१२/२०१९

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे,

विषय:-माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२० आवेदनपत्रातील अनु.क्र.१० मधील Minority Religion समोर ज्यु धर्माचे नाव समाविष्ट करणेबाबत

संदर्भ:- क्र.मुंविमं/माध्य.परीक्षा/२०९४ दिनांक ३०/११/२०१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुलक्षून कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२० आवेदनपत्रातील अनु.क्र.१० मधील Minority Religion समोर ज्यु धर्माचे नाव समाविष्ट करणेबाबतचा विषय दि.१२/१२/२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या परीक्षा समितीसमोर सादर केला असता खाली नमूद केल्याप्रमाणे ठराव संमत झालेला आहे.

ठराव-महाराष्ट्र शासन, अल्पसंख्यांक विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.अविवि-२०१७/ प्र.क्र.४/का-९ मंत्रालय, मुंबई ३२ दि.१० जानेवारी,२०१७ अन्वये राज्यातील लोकसमूहापैकी १)मुस्लिम २)ख्रिश्चन ३)शीख ४)बौध्द ५)झोराष्ट्रीयन(पारसी) ६) जैन ७)ज्यू या लोकसमुहांना शासनाने अल्पसंख्यांक लोकसमूह म्हणून दर्जा दिला असल्याची बाब लक्षात घेऊन योजनांची आखणी करण्यात यावी व अल्पसंख्यांक लोकसमूहांना त्याचा लाभ होईल याची दक्षता घ्यावी असे पत्रात नमूद केलेले असल्यान, इ.१० वी व इ.१२ वी च्या आवेदनपत्र अनु.क्र.१० मधील Minority Religion समोर १)मुस्लिम २)ख्रिश्चन ३)शीख ४)बौध्द ५)झोराष्ट्रीयन(पारसी) ६) जैन इ.धर्मांचा यापूर्वीच समावेश झालेला आहे.

त्याच धर्तीवर व उपरोक्त शासन पत्रानुसार माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२० च्या परीक्षेपासून आवेदनपत्रातअनु.क्र.१० मधील Minority Religion समोर ज्यु धर्माचे नाव समाविष्ट करणेबाबतच्या विषयावर परीक्षा समिती सभेत सांगोपांग चर्चा करण्यात आली व त्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२० च्या परीक्षेपासून आवेदनपत्रात अनु.क्र.१० मधील Minority Religion समोर ज्यु धर्माच्या नावाचा समावेश करावा असे ठरले.

तरी परीक्षांची ऑनलाईन आवेदनपत्र भरताना उपरोक्त ठरावानुसार कार्यवाही करण्याबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, राजेंद्रनगर, कोल्हापूर -४१६ ००४.**

---

क्र.कोविमं/शाखा माध्य परीक्षा/2812
कोल्हापूर ४१६००४.
दिनांक:-२७/१२/२०१९

प्रति,

सर्व मान्यताप्राप्त शाळा प्रमुख
सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्हा.

राज्य मंडळाचे जा. क्र.रा.मं./परीक्षा-२/६३८६ दि.२३/१२/२०१९ रोजीच्या माध्यमिक परीक्षा मार्च-२०२० आवेदनपत्रातील अनु.क्र.१० मधील **Minority Religion** समोर **ज्यु धर्माचे** नांव समाविष्ट करण्याबाबतच्या पत्राची या विभागीय मंडळाच्या अखत्यारीतील सर्व शाळाप्रमुखांनी नोंद घेऊन पुढील कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.